| अ.क्र. | निकष | कमाल गुण | गुणांकन पध्दत | द्यावयाचे गुण |
|---|---|---|---|---|
| २. | मागासवर्गीयांचे प्रमाण (लोकसंख्येशी टक्केवारी) | ५ गुण | १) जिल्हा सरासरीएवढी टक्केवारी | १ गुण |
| | | | २) जिल्हा सरासरीपेक्षा जादा टक्केवारीसाठी प्रत्येक पूर्ण टक्क्याला १ गुण. मात्र, कमाल गुण मर्यादा जिल्हा सरासरीपेक्षा ४ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास कमाल ५ गुणांवर सिमित करावे. | २ ते कमाल ०५ गुण |
| | | | ३) जिल्हा सरासरीपेक्षा कमी टक्केवारी असल्यास ० गुण देण्यात यावे. | ० गुण |
| ३. | आदिवासींचे प्रमाण (लोकसंख्येशी टक्केवारी ) | ५ गुण | १) जिल्हा सरासरीएवढी टक्केवारी | १ गुण |
| | | | २) जिल्हा सरासरीपेक्षा जादा टक्केवारीसाठी प्रत्येक पूर्ण टक्क्याला १ गुण. मात्र, कमाल गुण मर्यादा जिल्हा सरासरीपेक्षा ४ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास कमाल ५ गुणांवर सिमित करावे. | २ ते कमाल ५ गुण |
| | | | ३) जिल्हा सरासरीपेक्षा कमी टक्केवारी असल्यास ० गुण देण्यात यावे. | ० गुण |
| ४. | गावातील पूर्वीची पाणीपट्टी वसुली (शासनाने ठरविलेल्या किमान दराने अथवा त्यापेक्षा जास्त दराने पाणीपट्टी आकारली असल्यास तरच सदर गुण प्राप्त होतील नाहीतर शून्य गुण प्राप्त होतील.) | ५ गुण | १) ८० ते १०० टक्के वसुली | ५ गुण |
| | | | २) ५० ते ७९ टक्के वसुली | ३ गुण |
| | | | ३) ५० टक्के पेक्षा कमी वसुली | १ गुण |
| ५. | संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत बक्षीस मिळाले असल्यास. | १० गुण | १) विभाग किंवा राज्य स्तरावरील बक्षिस मिळाले असल्यास. | १० गुण |
| | | | २) जिल्हा स्तरावरील बक्षिस मिळाले असल्यास | ७ गुण |
| | | | ३) पंचायत समिती स्तरावरील बक्षीस मिळाले असल्यास | ४ गुण |
| | | | ४) जिल्हा परिषद मतदार संघ स्तरावरील प्रथम तीन पैकी क्रमांक मिळाला असल्यास. | २ गुण |
| | | | ५) कोणतेही बक्षीस नाही. | ० गुण |

टिप : शुध्द पाणी म्हणजे [illegible] आर्सेनिक, [illegible] नसावा)

[] FILENAME \p D:\BACKUP [illegible]

[illegible] –2

३. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत गावांची निवड वरील निकषानुसार करून योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

संजीव कुमार

(संजीव कुमार) २७/११/०५

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मा. अध्यक्ष , जिल्हा परिषद, (सर्व)

**विंधण विहिर कार्यक्रमासाठी खाजगी विंधणयंत्रांमार्फत करावयाच्या आवेधन कामाचे व तद्अनुषंगीक बाबींचे दर ठरवून खाजगी विंधणयंत्रे भाड्याने लावण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय ग्रापापु१००२/प्र.क्र.१३६/पापु-०७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २९ डिसेंबर, २००५

**वाचा:-** शासन ज्ञापन,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००४/प्र.क्र.६३६/पापु-०७, दि. ३०.१०.२००४ व दि. २३ मार्च,२००५.

**प्रस्तावना:-**

संदर्भीय शासन ज्ञापनान्वये विंधण विहिर कार्यक्रमासाठी खाजगी विंधणयंत्रांमार्फत करावयाच्या आवेधन कामाचे व तद्अनुषंगीक बाबीचे दर ठरवून देण्यात आले असून, या शासनमान्य दरांच्या अधीन राहून खाजगी विंधणयंत्र धारकांची विंधणयंत्रे दि. ३१.८.२००५ पर्यंत भाड्याने लावण्यास परवानगी देण्यात आली आहे.

२. विंधण विहिरी कार्यक्रम महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १०० अन्वये जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या साहित्याची खरेदी करण्याचे अधिकार जिल्हा परिषदांना देण्यात आलेले आहेत. त्यामुळे खाजगी विंधण यंत्रांमार्फत करावयाच्या आवेधन कामाचे व तद्अनुषंगीक बाबीचे दर ठरविण्याचे व त्यानुसार विंधणयंत्रे भाड्याने लावण्याचे अधिकार जिल्हा परिषदांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

**प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून खाजगी विंधण यंत्रांमार्फत करावयाच्या आवेधन कामाचे व तद्अनुषंगीक बाबींचे जिल्ह्याचे दर ठरविण्याचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदेस देण्यात येत आहेत.**

२. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांनी खाजगी विंधणयंत्रांमार्फत करावयाच्या विंधण कामाचे व तद्अनुषंगीक बाबींचे दर विश्लेषण करून जिल्हानिहाय कमाल दर

निश्चित करावेत व ते संबंधित जिल्हा परिषदांना दर वर्षी ३१ ऑगस्ट पूर्वी कळवावेत. चालू वर्षासाठीचे दर विश्लेषण लवकरात लवकर करून ते जिल्हा परिषदांना कळविण्यात यावे.

३. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांनी निश्चित केलेल्या कमाल दरांच्या अधीन राहून विंधण कामाचे व तदनुषंगीक बाबींचे दर संबंधित जिल्हा परिषदांनी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून निश्चित करावेत व त्या निश्चित केलेल्या दरांच्या अधीन राहून आवश्यकतेनुसार विंधणयंत्रे भाडयाने लावावीत.

४. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांच्या मार्फत चालू वर्षाचे दर विश्लेषण निश्चित होईपर्यंत संदर्भीय शासन ज्ञापनान्वये शासनाने निश्चित केलेल्या कमाल दराच्या अधीन राहून जिल्हा परिषदांनी दर निश्चित करण्याची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संजीव कुमार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१०. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
११. जिल्हाधिकारी (सर्व)
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३. जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, (सर्व)
१४. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१५. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१६. महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा परीक्षा)
१७. महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
१८. महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर (लेखा परीक्षा)
१९. महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
२०. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
२१. उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२२. प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२३. प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
२४. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
२५. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२६. तहसीलदार (सर्व)
२७. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
२८. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

नागरी/ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या तांत्रिक बदलास मान्यता देणे.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्र.ग्रापापु-१००६/प्र.क्र.३४३/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक २१ नोव्हेंबर, २००६**

**वाचा:-** शासन परिपत्रक, पा.पु.व स्व.वि.क्रं. संकिर्ण २००६/ प्रक्र २६/ पापु-१०, दि. १ जुलै, २००६

**परिपत्रक:-**

प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमध्ये नवीन गावे / वाडया यांचा समावेश करण्याबाबतची मागणी आल्यास त्याबाबत काय उपाययोजना करावी व त्याअनुषंगाने योजनेच्या संकल्पनात विशिष्ट प्रकरणी बदल करावे लागल्यास तांत्रिक बदलाच्या प्रस्तावास मान्यता शासन स्तरावरून घेण्याबाबतच्या सूचना संदर्भिय दिनांक १ जुलै, २००६ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. राज्यामध्ये मागणी आधारित समूह सहभागाचे धोरणानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी होत असून, दि. १.७.२००६ च्या संदर्भिय शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचना राज्याने ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी स्विकारलेल्या समूह सहभागाच्या धोरणाशी सुसंगत नसल्याने, **या परिपत्रकान्वये संदर्भिय दिनांक १.७.२००६ चे शासन परिपत्रक रद्द करुन शासन पुढील प्रमाणे सूचना देत आहे:-**

(१) यापूर्वी पूर्ण झालेल्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांमध्ये नवीन गावांचा / वाडीचा समावेश करण्यात येवू नये.

(२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगती पथावर असलेल्या योजनांमध्ये नवीन गावांचा / वाडीचा समावेश करणे अथवा एखादे गाव / वाडी वगळण्याबाबत निर्णय घेण्याचे **अधिकार जिल्हास्तरावरील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षते खालील समितीस देण्यात येत आहेत. या समितीची रचना पुढील प्रमाणे राहील:-**

| | |
|---|---|
| (१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| (२) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| (३) कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु. वि.,जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर असलेल्या योजनेमध्ये समावेश करण्याबाबतची मागणी गावाकडून / वाडीकडून प्राप्त झाल्यास या समितीने पुढील बाबींचा विचार करून निर्णय घ्यावा:-

(अ) प्रगतीपथावरील प्रादेशिक योजनेमध्ये एकाद्या गावांचा / वाडीचा समावेश केल्यामुळे त्या प्रादेशिक योजनेत समाविष्ट असलेल्या इतर गावांना निकषानुसार व समान दाबाने पाणी पुरवठा उपलब्ध होवू शकेल काय ?

(ब) योजनेचे पंपिंगचे तास वाढविण्याची आवश्यकता लागणार नाही.

(क) मागणी आधारित लोकसहभाच्या धोरणानुसार संबंधित गावचे / वाडीचे लाभार्थी योजनेच्या भांडवली खर्चाच्या १०% रक्कम संबंधित योजनेतील लोकसहभाग म्हणून भरण्यास व योजनेची देखभाल व दुरुस्ती करण्यास तयार आहे काय ?

(ड) गावाचा / वाडीचा प्रगतीपथावरील योजनेत समावेश केल्याने येणारा खर्च व त्या गावासाठी / वाडीसाठी स्वतंत्र योजना घेतल्याने येणारा खर्च यांची तुलना.

(४) नव्याने समावेश होणाऱ्या गावात / वाडीत सर्व लाभार्थ्यांना घरगुती / सामुहिक नळ जोडण्या देण्यात याव्यात.

(५) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर असलेल्या योजनेमधून वगळण्याबाबत एकाद्या गावाने/ वाडीने मागणी केल्यास त्या मागणीच्या अनुषंगाने सदर समितीने पुढील बाबींचा विचार करून निर्णय घ्यावा:-

१) त्या गावाचा/वाडीचा समावेश असलेल्या प्रगतीपथावरील प्रादेशिक योजनेचा पूर्ण होण्याचा संभाव्य दिनांक.

२) सदर गाव/ वाडी प्रगतीपथावरील प्रादेशिक योजनेमधून वगळल्याने होणारी बचत व त्या गावासाठी/ वाडीसाठी स्वतंत्र योजना घेण्यासाठी येणारा खर्च.

(६) प्रगतीपथावरील प्रादेशिक योजनेत गावाचा /वाडीचा समावेश केल्याने योजनेत होणाऱ्या तांत्रिक बदलास मान्यता देण्यास संबंधित प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे सक्षम राहतील.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २००६११२४१०३४४७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

संजीव कुमार

(संजीव कुमार) २५।११।

सहसचिव,महाराष्ट्र शासन

**प्रत,**

मा. मंत्री (पा.पु.व स्व.) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री (पा.पु.व स्व.) यांचे खाजगी सचिव.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व).
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व).
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व).
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, (सर्व).
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
अवर सचिव / कार्यासन अधिकारी, का. पापु-०६,०९,१०, १३,१७,१८,१९,२२ पा.पु.व स्व.वि., मंत्रालय, मुंबई.
संगणक कक्ष पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती पापु-०७

Pg-12\\Hp29732583912-w\d\New Folder\CR 343 GR.doc

**भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत**
**अंमलबजावणीचे धोरण**

---

**महाराष्ट्र शासन,**
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
**शासन परिपत्रक क्र.ग्रापाधो-११०८/प्र.क्र.३२/पापु.०७**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ मार्च, २००८

**शासन परिपत्रक :-**

भारत निर्माण कार्यक्रम सन २००५ मध्ये सुरु करण्यात आला असून या कार्यक्रमाचा कालावधी एप्रिल २००५ ते मार्च २००९ पर्यंत आहे. या कार्यक्रमामध्ये ग्रामीण पाणी पुरवठा हा एक महत्वाचा विषय असून, या अंतर्गत सन २००८-०९ च्या अखेरपर्यंत CAP 99 अंतर्गत सर्व न हाताळलेली, अंशतः हाताळलेली, Slipped Back व गुणवत्ता बाधित गावांचा प्रश्न पूर्णपणे सोडविणेचा उद्देश ठरविण्यात आलेला आहे. हा कार्यक्रम केंद्र शासनाचा Flagship कार्यक्रम म्हणून समजला जात असून त्याचे संनियंत्रण अत्यंत वरिष्ठ पातळीवर होत आहे. या योजनेंतर्गत दिनांक १ एप्रिल २००५ रोजी वरील वर्गवारीतील गावांची संख्या शासनास कळविण्यात आली होती व त्याप्रमाणे चार वर्षामध्ये ही गावे हाताळणे क्रमप्राप्त आहे. सन २००५-०६ व २००६-०७ मध्ये अनुक्रमे २८०६ गावे व ६१५२ वस्त्या हाताळल्या गेल्या असून दिनांक १.४.२००७ रोजी वरील वर्गवारीत ४५,५८९ गावे/वस्त्या हाताळणे शिल्लक होते. हे काम पूर्ण करण्याकरिता केंद्र शासनाने २००७-०८ करिता सुरुवातीला २२,००० गावांचे लक्ष्य महाराष्ट्र राज्याला दिले होते. मात्र, राज्यातील सर्व जिल्हयांचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी दिनांक २०-२१ ऑक्टोबर, २००७ रोजी यशदा, पुणे येथे चर्चा करुन जो कार्य आराखडा तयार करण्यात आला होता, त्याप्रमाणे १४९७५ गावे/वस्त्यांचा प्रश्न सोडविता येत होता. म्हणून केंद्र शासनाला विनंती करुन या वर्षीचे उद्दिष्ट २२,००० वरुन कमी करुन १४,९७५ एवढे करुन घेण्यात आले व त्याप्रमाणे सर्व जिल्हयांचे CAP 99 व Slipped Back अंतर्गत हाताळलेली व अंशतः हाताळलेल्या गावांचे उद्दिष्ट तसेच गुणवत्ता बाधित गावांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

२. यावर्षी या कार्यक्रमास गती देण्याकरिता जून-जुलै २००७ पासूनच राज्य, विभागीय पातळीवर तसेच जिल्हा पातळीवर अनेक बैठका होऊन उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता आढावा बैठका झाल्या व ज्या काही अडचणी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी विभागाच्या निदर्शनास आणल्या त्याप्रमाणे आवश्यक ते आदेश व परिपत्रके काढण्यात आली. असे असूनही फेब्रुवारी अखेरपर्यंत झालेल्या

कामाच्या आढाव्यावरुन आतापर्यंत फक्त उद्दिष्टाच्या ३१% काम झाल्याचे दिसत असून, मार्च महिन्यापर्यंत उद्दिष्ट १००% होईल याची शक्यता अत्यंत कमी आहे. एकीकडे दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व इतर खात्यातील अधिकाऱ्यांची असून त्या सर्व संबंधितांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करुन दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे. त्याचबरोबर यात काही अनुशेष राहिला तर तो दूर करण्याकरिता तसेच पुढच्या वर्षात उर्वरित गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याकरिता सविस्तर नियोजन करणे आवश्यक आहे.

३. दिनांक १० जानेवारी, २००८ रोजी मा.मंत्री (पा.पु.व स्व.) यांच्याकडील बैठकीत त्यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे यावर्षीचे काम करीत असतानाच पुढच्या वर्षी घ्यावयाच्या योजनेला प्रशासकीय मंजूरी देऊन निविदा प्रक्रिया आताच सुरु करुन पावसाळयापूर्वी त्यातील अधिकाधिक काम पूर्ण करणे आवश्यक आहे. असे न झाल्यास भारत निर्माण अंतर्गत दिलेले उद्दिष्ट पूर्ण करणे व केंद्र शासनाच्या अनुदानाचा उपयोग पुढच्या वर्षाकरिता करता येणार नाही. केंद्र शासनाच्या स्तरावर घेण्यात येणाऱ्या आढावा बैठकीत आपले राज्य इतर राज्याच्या तुलनेत बरेच मागे आहे असे चित्र दिसून येते. ही परिस्थिती महाराष्ट्रासारख्या राज्याला भूषणावह नाही व याबाबत सर्वांनी प्रयत्न करुन उद्दिष्ट पूर्ण करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

४. ग्रामीण पाणी पुरवठा क्षेत्रामध्ये राज्याने २०००-०१ पासून अंमलबजावणीत धोरणात्मक बदल केला आहे व पुरवठा आधारित धोरण रद्द करुन मागणी आधारित धोरण सुरु करुन पाणी पुरवठा योजनेचे नियोजन व अंमलबजावणीमध्ये ग्रामीण जनतेचा पूर्णपणे सहभाग व्हावा व योजनेमध्ये स्वामित्वाची भावना निर्माण व्हावी यासाठी यासंबंधीचे अधिकार ग्रामपंचायत अधिनियमाखाली, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडे दिलेले आहेत. या समितीने नळ योजनेचे नियोजन तांत्रिक सेवा पुरवठादार (Technology Solution Provider) किंवा जिल्हा परिषदेच्या मदतीने करणे व त्यांच्या पातळीवर कंत्राटदारांची नियुक्ती पारदर्शक पध्दतीने करुन नळ योजना राबवावयाची आहे. मागणी आधारित धोरणांतर्गत जरी अधिकार ग्राम समितीला देण्यात आले असले तरी ग्रामीण पाणी पुरवठा करण्याविषयी शासनाची किंवा जिल्हा परिषदेची भूमिका संपलेली आहे असे समजणे चुकीचे आहे. केंद्र व राज्य शासनाच्या धोरणानुसार न हाताळलेली, अंशतः हाताळलेली व गुणवत्ता बाधित गावांची निवड ही अजूनही जिल्हा परिषदेने करावयाची असून त्या आधारे योजनांची आखणी व अंमलबजावणीकरिता ग्राम समितीला सूचना द्यावयाची आहे. अशा सर्व योजनांना तांत्रिक मान्यता

देण्याचे अधिकार हे जिल्हा परिषदेकडेच आहेत. तसेच ग्राम पातळीवर काम होत असताना त्यावर तांत्रिक देखरेखही करणे ही संबंधित कनिष्ठ अभियंता/उप अभियंता/कार्यकारी अभियंता यांची जबाबदारी आहे. केंद्र व राज्य शासनाने ठरविलेल्या आदेशाप्रमाणे उद्दिष्टपूर्तीची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची असून त्यांनी याकरिता कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा व त्यांचे इतर तांत्रिक अधिकारी तसेच गट विकास अधिकारी व ग्रामसेवक इत्यादी यांना एकत्रित घेऊन कोणत्या गावांमध्ये कोणत्या प्रकारची योजना राबवावयाची याचा निर्णय घ्यावयाचा आहे व त्याप्रमाणे ग्राम समितीला सविस्तर नियोजन करण्याबद्दल तांत्रिक मार्गदर्शन व आवश्यक ती सहायता प्रदान करावयाची आहे. अलिकडे घेण्यात आलेल्या आढाव्यामध्ये अनेक जिल्हा परिषदेतील अधिकारी ही भूमिका योग्य रितीने पार पाडत नाहीत व मागणी आधारित धोरणांतर्गत जिल्हा परिषदेतील तांत्रिक व प्रशासनिक अधिकारी यांची भूमिका संपलेली आहे असा गैरसमज झाल्याचे दिसून येते.

५. वरील पार्श्वभूमीवर या वर्षातील (२००७-०८) उर्वरित गावे व पुढच्या वर्षीच्या (२००८-०९) उद्दिष्टातील गावे व वस्त्यांमध्ये पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी सविस्तर नियोजन करणे व त्याबद्दल क्रियान्वयन धोरण (Implementation Strategy) तयार करण्याची गरज आहे. त्याचबरोबर सर्व संबंधित संस्था व अधिकाऱ्यांना वर्ष संपण्याची वाट न पाहता आतापासूनच गतीशील करण्याची आवश्यकता आहे.

६. महाराष्ट्र राज्यामध्ये आतापर्यंत झालेल्या कामाचा आढावा घेता असे दिसून येते की, राज्यातील एकंदरीत २७,८७३ ग्रामपंचायतीअंतर्गत ४१,००० गावे व सुमारे ४५,७०० वाडया/वस्त्या आहेत. आजतागायत राज्यामध्ये २,२०,००० हातपंप्स/ विद्युतपंप्स, ३२,६१२ प्रादेशिक/स्वतंत्र पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत. म्हणून नियोजन आराखडा तयार करीत असताना यापूर्वी अस्तित्वात असलेल्या योजनेचा आढावा घेऊन व त्याचा पुरेपूर उपयोग करुन पुरवणी योजना करणे आवश्यक आहे. योजना आखताना त्याच्या देखभाल दुरुस्तीचा (O & M) खर्च पाणीपट्टीच्या वसूलीतून निघेल, याची खात्री करणे जरुरीचे आहे. केंद्र व राज्य शासनाच्या धोरणानुसार कुठल्याही वाडी/वस्तीमध्ये जेथे ५० पेक्षा जास्त लोकसंख्या असेल तेथे शासनामार्फत पाणी पुरवठा व्यवस्था करणे आवश्यक आहे. हे करीत असताना कमीत कमी खर्चाची योजना (Least Cost Solution) आवश्यक असून त्या अनुषंगाने जेथे केवळ विंधण विहिरी घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटत असेल

अपुरी पडत असेल. सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेऊन पुरवणी/वाढीव स्वरुपाची योजना करण्यासाठी नियोजन करणे व त्याची अंमलबजावणी करण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**११. ज्या ठिकाणी नवीन योजना घेणे क्रमप्राप्त असेल तेथे अशा योजना तीन टप्प्यांमध्ये कार्यान्वित कराव्यात. पहिल्या टप्प्यामध्ये स्त्रोत विहिरीचे काम जून-जुलै अखेरपर्यंत (पावसाळा सुरु होण्यापूर्वी) करावे. दुसऱ्या टप्प्यामध्ये उर्ध्व नलिका किंवा गुरुत्व नलिका व पंपिग मशिनरीचे काम पूर्ण करुन गावात पाणी आणावे व तिसऱ्या टप्प्यात गावातील साठवण व वितरण व्यवस्था पूर्ण करावी. याप्रमाणे सर्व संबंधित ग्रामपंचायत व ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितींना अशा योजनेच्या अंमलबजावणीकरिता निविदा काढण्यासाठीचे आदेश द्यावेत. पहिल्या टप्प्याची कामे जून-जुलै २००८ पर्यंत पूर्ण झाल्यावरच टप्पा-२ व ती पूर्ण झाल्या नंतरच टप्पा-३ ची कामे हाती घेण्यात येतील ही अट निविदेत समाविष्ट करावी. टप्पा-१ चे काम जून-जुलैपर्यंत पूर्ण न झाल्यास दंडात्मक कार्यवाही केली जाईल व कंत्राट रद्द करता येऊ शकेल अशी अट समाविष्ट करावी.**

**१२. स्त्रोत विहीत करीत असताना सर्वात आधी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून विहिरींची जागा निश्चित करणे आवश्यक ठरेल. अशा ठिकाणी वरिष्ठ भूवैज्ञानिक, सहायक भूवैज्ञानिक यांनी स्त्रोत निश्चिती १५ ते ३० एप्रिलपर्यंत करावी. ज्या भागात पावसाळयाची सुरुवात लवकर होते तेथे स्त्रोत निश्चिती प्राधान्य देऊन करावी.**

१३. एप्रिल ते जून-जुलैपर्यंत विहीर खोदकाम व बांधकाम जरी महत्वाकांक्षी वाटत असले तरी याकरिता जर आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध असलेल्या सक्षम कंत्राटदाराची निवड झाली तर हे काम मागील अनुभव लक्षात घेता ६० ते ७० दिवसांमध्ये पूर्ण करणे शक्य आहे. याकरिता असे सुचविण्यात येत आहे की, ज्या संस्थेला हे काम दिले जाईल त्यांनी अटी व शर्तीद्वारे यांत्रिकी पध्दत वापरुन Test Bore घेऊन व blasting चा उपयोग करुन विहिरीचे खोदकाम करावे. या मोहिमेंतर्गत Test Bore घेणे अनिवार्य राहील. Test Bore घेण्याचा फायदा म्हणजे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने निश्चित केलेल्या जागी पाण्याची उपलब्धता, खोली व माती/खडकाचे प्रकार हयाबाबत निश्चित माहिती मिळण्यास मदत होईल. काही जिल्हयांमध्ये विहिरीचे खोदकाम करताना तेथे आधी बोअर्स घेतल्या जातात व त्या बोअरमध्ये blasting करुन मग पोकलेन, जेसीबी किंवा क्रेनच्या मदतीने

तेथे विंधण विहिरी घेणे, जेथे उच्च क्षमतेच्या विंधण विहिरी असतील तेथे स्थानिक गरजेप्रमाणे त्यावर विद्युतपंप बसवून लघु पाणी पुरवठा योजना करणे, जेथे एखाद्या प्रादेशिक योजनेशी जोडून गावाचा प्रश्न सुटत असेल तर तशा प्रकारची योजना घेणे आवश्यक आहे.

७. यासंदर्भात संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचेशी चर्चा करण्यात आली असून प्रत्येक जिल्हयामध्ये जेथे अशा विंधण विहिरी घेणे शक्य असेल तेथे जिल्हयातील वरिष्ठ भूवैज्ञानिक व जिल्हा परिषदेतील सहायक भूवैज्ञानिक व इतर भूवैज्ञानिकांनी मिळून कार्य आराखडा तात्काळ तयार करुन विंधण विहिरीचा धडक कार्यक्रम आखून पुढच्या तीन महिन्यांमध्ये राबवावयाचा आहे. याकरिता जिल्हा नियोजन मंडळ (DPC) अंतर्गत झालेल्या तरतुदीचा उपयोग करता येईल व आवश्यक असल्यास राज्य स्तरावरुन अधिक निधी उपलब्ध करण्यात येईल. ज्या ठिकाणी भूजलाची पातळी वर असेल व जेथे उच्च क्षमतेच्या विंधण विहिरी घेता येतील अशा ठिकाणी धोरणाचा भाग म्हणून अशा विंधण विहिरींमध्ये विद्युतपंप किंवा दुहेरी पंपिंग व्यवस्था बसवावी व त्यावरच वितरण व्यवस्था विकसित करावी. या तीनही प्रकारच्या योजना निश्चित केलेल्या गावांत (Targeted Habitations) पुढच्या तीन महिन्यांमध्ये पूर्ण कराव्यात.

८. राज्यामध्ये सुमारे ४००० नळ योजना दुरुस्तीअभावी, स्त्रोतातील पाणी कमी झाल्यामुळे किंवा विद्युत पुरवठा खंडीत झाल्यामुळे किंवा पाणीपट्टी न भरल्यामुळे बंद आहेत. अशा अनेक योजना सुरु करुन, अंशतः हाताळलेली, न हाताळलेली व गुणवत्ता बाधित गावांचा प्रश्न सोडविता येईल. याकरिता शिवकालीन पाणी साठवण योजनेतील उपाययोजना करुन, वीज मंडळ, जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची थकबाकी भरुन योजना पुनर्जिवित कराव्यात.

९. राज्यामध्ये Sectoral Reforms, स्वजलधारा, जलस्वराज्य, आपले पाणी, वर्धित वेग व महाजल अशा अनेक योजना अर्धवट आहेत. कोणत्याही परिस्थितीत अशा सर्व योजना २००८-०९ मध्ये पूर्ण कराव्यात.

१०. वरील उपाययोजनांशिवाय अनेक गावांचा प्रश्न हाताळण्याकरिता नवीन नळ योजना हाती घ्याव्या लागतील. अशा योजना हाती घेण्यापूर्वी त्या त्या गावामध्ये असलेल्या सर्व पायाभूत सुविधा (Infrastructure) चा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. अनेक गावांमध्ये पूर्वी तयार करण्यात आलेल्या टाक्या व वितरण व्यवस्था अस्तित्वात असून कदाचित वाढत्या लोकसंख्येमुळे ती

दगडमाती बाहेर काढली जाते. अशा यांत्रिकी माध्यमांचा उपयोग केल्यास विहिरींचे खोदकाम व बांधकाम पावसाळयापूर्वी विहित वेळेत होऊन कामे पूर्ण करणे शक्य होईल.

१४. **वरीलप्रमाणे टप्पा-१ चे काम करण्याकरिता जिल्हा परिषदेच्या पातळीवर जाहीरात काढून दिनांक ३० मार्च, २००८ पर्यंत ज्या संस्थांकडे मशिनरी उपलब्ध आहेत अशांची यादी तालुकानिहाय तयार करण्यात यावी व ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना उपलब्ध करण्यात यावी.** अनेक ठिकाणी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्वत:हून अशी कामे करीत असतात. अशा परिस्थितीत या संस्थांकडून विहिरींचे खोदकाम व बांधकाम जॉब बेसिसवर करुन घ्यायला हरकत नाही. इतरत्र पूर्ण योजनेच्या निविदा काढून कंत्राट निश्चित करावीत व आधी नमूद केल्याप्रमाणे टप्पा-१, २ व ३ हया क्रमाने काम करुन घेण्यात यावे. टप्पा-१ चे काम वेळेत पूर्ण करण्याकरिता संबंधित कंत्राटदार वर नमूद केलेल्या संस्थेकडून यंत्रसामुग्री उपलब्ध करुन घेऊ शकेल. तसेच, Test Bore व Blasting करण्याकरिता आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध करण्याची जबाबदारी त्यांची राहील. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (GSDA) यांनी त्यांना Test Bores, Blasting इत्यादी कामात मदत करायची आहे.

१५. वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याकरिता मार्चमध्येच सविस्तर सूक्ष्म नियोजन (Micro Planning) करुन कार्यवाही सुरु करणे आवश्यक आहे. यासाठी सर्वप्रथम सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व त्यांचे कार्यकारी अभियंता यांनी उप व कनिष्ठ अभियंता तसेच भूवैज्ञानिक, गट विकास अधिकारी इत्यादींना एकत्र बसवून यावर्षी अपूर्ण राहिलेली गावे/वाडया व पुढच्या वर्षी हाताळावयाची गावे/वाडयांचा सविस्तर आढावा दिनांक १९ मार्च, २००८ च्या आत घ्यावा. वरीलप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या जिल्हयामधील सर्व संबंधित गावांचा सूक्ष्म आढावा घेऊन त्या ठिकाणी करावयाच्या योजनांविषयी दिनांक २४ मार्चपर्यंत आराखडा तयार करावा. हे करीत असताना जिल्हा स्तरावर वरिष्ठ भूवैज्ञानिक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता, जलस्वराज्य, आपले पाणी येथील अधिकारी यांना नियोजनामध्ये सहभागी करुन घ्यावे. आराखडा तयार करतांना जोडलेल्या सहपत्राप्रमाणे माहिती संकलित करुन, विभागीय स्तरावरील अधिक्षक अभियंता, भारत निर्माण कक्ष यांच्याकडे दिनांक २४ मार्च, २००८ रोजीच पाठवावी. अधिक्षक अभियंता, भारत निर्माण यांनी ही माहिती जिल्हानिहाय संकलित करुन विभागीय

उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याशी चर्चा करुन दिनांक २६ मार्च, २००८ रोजी मंत्रालय येथे हया आराखडयाचे सादरीकरण करावे.

१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हयाच्या आराखडयाबाबत दिनांक ४ एप्रिल २००८ च्या आत पंचायत समिती स्तरावर बैठका आयोजित करुन गट विकास अधिकारी व उप अभियंत्यांचे मार्गदर्शनाखाली संबंधित गावाचे सरपंच, ग्रामसेवक व अध्यक्ष, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांना या धोरणाच्या कार्यवाहीबद्दल सविस्तर मार्गदर्शन करावे. या बैठकीत तालुक्यातील तांत्रिक सेवा पुरवठादार, पाणी पुरवठा क्षेत्रातील काम करणाऱ्या कंत्राटदार संस्था व विहिर खोदकाम व बांधकाम करण्याकरिता ब्लास्टिंग व खोदकाम यंत्रसामुग्री उपलब्ध असलेल्या संस्थांना देखील आमंत्रित करण्यात यावे. या बैठकीस भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे भूवैज्ञानिक देखील हजर राहतील.

१७. यानंतर सर्व संबंधित गावाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने नळ योजनेचे अंदाजपत्रक तयार करणे, प्रशासकीय मान्यता देणे व निविदेद्वारे कंत्राटदार निश्चित करणे ही सर्व कामे १५ ते ३० एप्रिल २००८ अखेर पूर्ण करावीत व १ मेच्या आत प्रत्यक्ष कामास सुरुवात करावी. १५ जूनपर्यंत विहिरीचे खोदकाम बांधकामासह पूर्ण करावे. एप्रिल अखेरपर्यंत जिल्हा परिषदेमार्फत टप्पा-१ चे काम पूर्ण करण्याकरिता आवश्यक असलेली रक्कम ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला बँक ड्राफ्टच्या माध्यमातून देण्यात यावी. (विहिरीचे काम संपूर्ण योजनेच्या सुमारे ३०% असेल असे गृहीत धरुन तेवढया कामाकरिता एक रकमी अनुदान देण्यास हरकत नाही)

१८. टप्पा-१ अंतर्गत पावसाळयापूर्वी विहिरीचे काम पूर्ण झाल्यानंतर टप्पा-२ अंतर्गत जेथे शक्य असेल तेथे पावसाळयामध्ये उर्ध्व नलिकांचे काम हाती घेण्यात यावे व ते काम सप्टेंबर-ऑक्टोबर अखेरपर्यंत पूर्ण करावे जेणेकरुन नवीन स्त्रोतातील पाणी गावात उपलब्ध करुन देता येईल. यानंतरच टप्पा-३ ची कामे हाती घेऊन कोणत्याही परिस्थितीत जून २००९ पर्यंत अशा योजनांची सर्व उपांगे पूर्ण करावी.

१९. वर नमूद केलेली प्रक्रिया भारत निर्माण, व्यतिरिक्त जलस्वराज्य, आपले पाणी व इतर अपूर्ण योजनांमधील विहिरींचे काम हाती घ्यावयाचे असेल तर त्याकरिता देखील लागू राहील.

२०. अनेक जिल्हा परिषदांशी चर्चा करीत असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने निश्चित केलेल्या जिल्हा दरसूचीपेक्षाही लोखंडी पाईप्स व सिमेंटचे दर वाढल्यामुळे व पर्यायाने दरडोई खर्चामध्ये

वाढ होत असल्यामुळे नळ योजना राबवण्यिास अडचणी येत आहेत. अशा सर्व प्रकरणी स्वतंत्र आदेश लवकरच काढण्यात येत आहेत.

२१. वरील कामाचे समन्वय व संनियंत्रण मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा स्तरावरील भारत निर्माण कक्ष करेल. जिल्हा स्तरीय कक्ष याविषयी प्रत्येक महिन्याला विभागस्तरीय भारत निर्माण कक्षाकडे गावनिहाय प्रगती अहवाल सादर करतील. अधिक्षक अभियंता, भारत निर्माण कक्ष हे प्रत्येक महिन्याच्या ४ तारखेला राज्यस्तरीय बैठकीत उपस्थित राहून याविषयी प्रगती अहवाल सादर करतील. वरील कार्यवाही ही कालबध्द स्वरुपाची असून या कालावधीमध्ये कोणत्याही संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना अत्यावश्यक कारणे वगळून रजा मंजूर करण्यात येऊ नये.

२२. टप्पा-१ म्हणजेच स्त्रोताचे काम पूर्ण करण्यासाठी अपेक्षित असणारा लोक वर्गणीचा निधी ठराविक कालावधीत जमा न झाल्यास हा निधी पुढील टप्पा सुरु करण्याआधी जमा करण्याची लेखी हमी संबंधित ग्रामपंचायत देईल. तसेच हागणदारी मुक्त करण्याच्या ग्रामपंचायतीच्या लेखी हमीच्या आधारे योजनेची अंमलबजावणी सुरु करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०३१८१२३९३९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( डॉ.राजन खोब्रागडे )**
शासनाचे सह सचिव

प्रति,
मा.राज्यपाल, यांचे स्वीय सहायक
मा.मुख्यमंत्री, यांचे स्वीय सहायक
मा.उप मुख्यमंत्री, यांचे स्वीय सहायक
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
\\Ws07\D\2008\GR -08\CR 32 08 Bharat Nirman Policy 180308.doc

सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

\\Ws07\D\2008\GR -08\CR 32 08 Bharat Nirman Policy 180308.doc

**Bharat Nirman : Village wise, Taluka wise details regarding proposed measures for piped WSS**

| Sr. No | Name of Village | Talukas | Category | | | Population | Existing infrastructure | Proposed measures | | | | Proposed new Piped WSS | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | CAP-99 | SB | Quality affected villages | | | Ongoing schemes to be completed | Repair or revival of existing scheme or bore wells | New Boe wells with HP/PP | Connecting villages e to existing regional PWSS | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |

## उद्दीष्ट हाताळणीचे वेळापत्रक

| अ.क्र. | दिनांक | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | १९ मार्च, २००८ | मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, उप कनिष्ट अभियंता, भूवैज्ञानिक यांची बैठक आयजित करण यावर्षी अपूर्ण राहिलेली गावे/वाडया व पुढच्या वर्षी हाताळावयाच्या गावे/वाडयांचा सविस्तर आढावा घ्यावा. |
| २ | २४ मार्च, २००८ | वरीलप्रमाणे घेतलेल्या आढाव्याच्या अनुषंगाने त्या त्या जिल्हयातील सर्व संबंधित गावांमध्ये घ्यावयाच्या योजनांविषयीचा आराखडा तयार करावा, यासाठी म.जी.प्रा. चे कार्यकारी अभियंता, जलस्वराज्य, आपले पाणी येथील अधिकारी यांना नियोजनामध्ये सहभागी करुन घ्यावे. या शासन परिपत्रकासोबत जोडलेल्या सहपत्रानुसार माहिती संकलित करुन ती विभागीय स्तरावरील अधिक्षक अभियंता, भारत निर्माण कक्ष यांचेकडे सादर करावा. |
| ३ | २६ मार्च, २००८ | अधिक्षक अभियंता, भारत निर्माण कक्ष यांनी उपरोक्त जिल्हानिहाय माहिती संकलित करुन विभागीय उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याशी चर्चा करुन मंत्रालय येथे या आराखडयाचे सादरीकरण करावे. |
| ४ | ४ एप्रिल, २००८ | या तारखेपूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा आराखडयाबाबत पंचायत समिती स्तरावर बैठका आयोजित करुन गटविकास अधिकारी व उप अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित गावांचे सरपंच, ग्रामसेवकव अध्यक्ष, ग्रा.पा.पु व स्व.समिती यांना या धोरणाच्या कार्यवाहीबद्दल सविस्तर मार्गदर्शन करावे. |
| ५ | १५ ते ३० एप्रिल, २००८ | सर्व सबंधित गावांच्या ग्राम पाणी पुरवठ व स्वच्छता समितीने नळ योजनेचे अदाजपत्रक तयार करणे प्रशासकीय मान्यता देणे व निविदेद्वारे कंत्राटदार निश्चित करणे ही सर्व कामे या कालावधीत पूर्ण करावीत. |
| ६ | १ मे, २००८ | योजनेच्या कामांना प्रत्यक्ष सरुवात करावी. |
| ७ | १५ जून, २००८ | **टप्पा-१** यापूर्वी विहीरीचे खोदकाम बांधकामसह पूर्ण करावे. |
| ८ | सप्टेंबर- आक्टो.२००८ | **टप्पा-२** शक्य असेल तेथे पावसाळयामध्ये उर्ध्व/गुरुत्व नलिकांचे काम पूर्ण करण्यात यावे. |
| ९ | जून, २००९ | **टप्पा-३** साठवण व वितरण व्यवस्थेची कामे पूर्ण करावीत. |

**भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांची आखणी व अंमलबजावणी संबंधी मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन परिपत्रक क्र. ग्रापाधो-११०८/ प्र.क्र. ३२/ पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २२ मे, २००८.**

संदर्भ :- शासन परिपत्रक पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, क्र. ग्रापाधो-१४८/ प्र.क्र. ३२/ पापु-०७, दि.१८ मार्च २००८

**प्रस्तावना :-**

भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा हा एक महत्वाचा विषय असून, त्या अंतर्गत सन मार्च-२००९ अखेरपर्यंत सर्वसमावेशक कृती आराखडा (कॅप-९९) नुसार अद्याप न हाताळलेली एन.सी./ पी.सी. गावे/ वाड्या, सर्वेक्षण २००३ नुसार दुबार हाताळावयाची एन.सी./ पी.सी. गावे/ वाड्या तसेच गुणवत्ताबाधीत गावे/ वाड्यां मधील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्णपणे सोडविण्याबाबत केंद्र शासनाने उद्दिष्ट ठरवून दिले आहे.

सन-२००५-०६ ते २००७-०८ या कालावधीत कॅप-९९ मधील ९०४७, दुबार हाताळावयाच्या गावांपैकी ६५९० व गुणवत्ताबाधीत मधील ३१०६ अशा एकूण १८७४३ गावे/ वाडयांचा प्रश्न हाताळण्यात आला असला तरी सन २००८-०९ या वर्षात अजून ३५८३३ गावे/ वाडया हाताळावयाच्या शिल्लक आहेत. उर्वरिंत गावे/ वाड्या हया भारत निर्माण कार्यक्रमाच्या कालावधीत म्हणजे मार्च २००९ अखेरपर्यंत हाताळावयाच्या असून हे फार मोठे आव्हानात्मक काम आहे. ही बाब विचारात घेवून कामाचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासंबंधीचे धोरण व मार्गदर्शक सुचना संदर्भिय परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रकान्वये कामाचे तीन टप्पे पाडून पहिल्या टप्प्यात स्त्रोत बांधकाम जून/ जुलै अखेर पूर्ण करुन दुसऱ्या टप्प्यात उर्ध्ववाहिनी/ गुरुत्ववाहिनी व पंपिंग मशिनरीचे काम पूर्ण करुन गावात पाणी आणल्यानंतर तिसऱ्या टप्प्यात गावातील साठवण टाकी व वितरणव्यवस्थेचे काम हाती घेवून पूर्ण करण्याबाबतच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

वरील कार्यक्रमाचा विभागवार आढावा घेतला असता, त्यावेळी पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण केल्यानंतर दुसऱ्या व त्यानंतर तिसऱ्या टप्प्याचे काम हाती घ्यावयाचे झाल्यास मध्यंतरीच्या काळात बांधकाम साहित्याच्या दरात मोठ्या प्रमाणात दरवाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही व त्यामुळे योजनेतील मंजूर दराने काम करणे शक्य होणार नाही त्यासाठी एकतर भाववाढीची तरतूद योजनेमध्ये व निविदेमध्ये करावी लागेल अन्यथा योजनेचे टप्पे पाडून प्रत्येक टप्प्याला त्या-त्या वेळच्या दरसूचीनुसार वेगवेगळी मंजुरी घेवून काम करावे लागेल. तेंव्हा योजनेचे टप्पे पाडण्यास वेगवेगळी मंजुरी देता येईल काय, या संबंधी मार्गदर्शन करणे बाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून विनंती करण्यात आली. तसेच मोठ्या प्रमाणात काम हाती घ्यावे लागणार असल्याने योजनेची अंदाजपत्रके तयार करणे व बांधकामावर तांत्रिक पर्यवेक्षणासाठी कनिष्ठ

अभियंत्यांची पदे भरण्यासाठी तसेच कंत्राटीपध्दतीने तात्पुरती नेमणूक करण्याबाबत परवानगी मिळणेबाबतही क्षेत्रीय कार्यालयाकडून विचारणा होत आहे.

भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने दिलेले उद्दिष्ट विहित मुदतीत पूर्ण करणे व कामाची निकड लक्षात घेवून योजनेचे टप्प्या-टप्प्याने काम हाती घेवून पूर्ण करणे, पाणी पुरवठा योजनेची आखणी, अंमलबजावणी व तांत्रिक पर्यवेक्षणाच्या कामासाठी कंत्राटी अभियंत्यांकडून काम करुन घेण्यास परवानगी देणे, तसेच या कामासाठी जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची मदत घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**परिपत्रक :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबी विचारात घेवून भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनेची कामे विहित कालावधीत व गुणवत्तापूर्वक पूर्ण करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

१) संदर्भाधीन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे, प्रथम पहिल्या टप्प्यातील कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेवून काम हाती घ्यावे. पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या टप्प्यातील व त्यानंतर तिसऱ्या टप्प्यातील पाणी साठवण टाकी व वितरणव्यवस्थेचे कामाचे अंदाजपत्रक तयार करुन वेगळयाने प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी घेवून काम हाती घ्यावे.

२) सदरचे काम अल्पावधीत पूर्ण करावयाचे असल्याने योजनेतील उद्‌भव विहिरीचे काम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत तातडीने हाती घ्यावे. जी तांत्रिक कुशलतेचे कामे आहेत, जसें पाईप पुरवठा, अंथरणे, जोडणी करुन चाचणी देणे, पंपिंग मशिनरी उभारणे व पाण्याची टाकी बांधणे इत्यादी कामे खुल्या पध्दतीने स्पर्धात्मक अल्प मुदतीची निविदा काढून हाती घेण्यात यावीत. त्याशिवाय मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचेमार्फत प्रचलित नियमाच्या अधिन राहून काम करुन घेण्यासही मुभा देण्यात येते.

३) स्त्रोत विकसीत करण्याचे काम कोणत्याही परिस्थितीमध्ये जून / जुलै अखेर पूर्ण करणे, उर्ध्ववाहिनी / गुरुत्ववाहिनीचे काम नोव्हेंबर / डिसेंबर २००८ अखेरपर्यंत पूर्ण करणे, तसेच गावातील पाणी साठवण व वितरण व्यवस्थेचे काम मार्च २००९ अखेरपर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामाचे नियोजन व अंमलबजावणीची आखणी करुन त्यानुसारच निविदेत कार्यक्रम नमूद करावा.

४) यंदाच्या पावसाळयापूर्वी स्त्रोतांची कामे काही कारणामुळे शक्य नसल्यास, स्त्रोताचे सर्वेक्षण करुन तेथे गरजे प्रमाणे एक किंवा त्यापेक्षा जास्त टैस्ट बोअर्स पावसाळयापूर्वी घेऊन, स्त्रोताची Yield बद्दल खात्री करुन पावसाळयानंतर त्वरित स्त्रोत विकसित करावे. Test बोअर्स हे सर्वेक्षणाचा भाग म्हणून ग्राहय धरण्यात यावे व त्याकरिता भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून उद्‌भव प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर त्या ठिकाणी ट्रायल बोअरचे काम जिल्हा परिषदेमधील उप अभियंता (यांत्रिक) मार्फत तातडीने घ्यावे. या कामा करीता अंदाजपत्रक तयार करण्यासाठीच्या २ टक्के रक्कमेतून निधी उपलब्ध करुन द्यावा.

D:\2008\GR-08~1\CR 32 08 Papuyo Amalbajavani (G.R.).doc

५)    नविन हाती घ्यावयाच्या पाणी पुरवठा योजनेची आखणी, अंदाजपत्रक तयार करणे, अंमलबजावणी करणे, तसेच तांत्रिक पर्यवेक्षण करुन कामाची गुणवत्ता राखणे, तसेच झालेल्या कामाचे वेळोवेळी मुल्यमापन करुन लेखेजोखे तयार करणे इत्यादी कामासाठी ग्रामसभेच्या मान्यतेने जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यापैकी कोणत्याही एका यंत्रणेची **"तांत्रिक सल्लागार"** म्हणून निवड करण्याची मुभा राहील. अशावेळी योजनेचे अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक पर्यवेक्षण करणे व प्रशासकीय खर्चासाठी योजनेच्या किंमतीच्या २ टक्के, ५ टक्के व २ टक्के अनुक्रमे रक्कम जिल्हा परिषदेकडे राखून ठेवून **"तांत्रिक सल्लागार"** म्हणून निवड केलेल्या यंत्रणेला परस्पर देण्यात यावी. जिल्हा परिषद तांत्रिक सल्लगाराचे काम पहात असल्यास सर्वेक्षणासाठी वाहन व इंधनावरील खर्च या रक्कमेतून भागवावा.

६)    येथे विशेषत्वाने खुलासा करण्यात येतो की, योजनेचे अंदाजपत्रक तयार करणे व तांत्रिक पर्यवेक्षणाचे काम जिल्हयातील निवडसूची वरील खाजगी तांत्रिक सल्लागार अथवा इतर संस्थांकडून करुन घेण्यास ग्रामसभेस प्रचलित पध्दतीनुसार मुभा राहणार आहे.

७)    योजनेच्या तांत्रिक पर्यवेक्षणाचे काम जिल्हा परिषदेमार्फत हाती घ्यावयाचे असल्यास, कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंत्याची रिक्त पदे त्वरित भरणे आवश्यक आहे. सदरची रिक्त पदे त्वरित भरणेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला यापूर्वीच कळविण्यात आले आहे परंतू ती पदे भरण्यास अडचणी येत असल्यास कंत्राटी पध्दतीने तांत्रिक कामे घेण्यास जिल्हा परिषदेला परवानगी देण्यात येत आहे. यासाठी होणारा खर्च, योजना तयार करणे, तांत्रिक पर्यवेक्षण व प्रशासकीय खर्चापोटीच्या तरतूदीमधून भागवावा. कंत्राट पध्दतीने अभियंते लावताना सेवा निवृत्त अभियंते यांना प्राधान्य देता येईल. इतर अभियंत्यांना काम देण्याकरीता त्यांना पाणी पुरवठा योजनेतील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा.

८)    सद्य:स्थितीत बांधकामाच्या साहित्यातील, जसे सिमेंट, स्टिल व पाईपचे दर मोठ्या प्रमाणात वाढले असून योजनेच्या मूळ मंजूर किंमतीमध्ये कामे पूर्ण करण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे योजनेचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन शासनास मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहेत. मूळ मंजूर योजनेच्या १५ टक्के पर्यंतच्या वाढीव खर्चाच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार या विभागाच्या शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००७/ प्र.क्र. २४३/ पापु-०७, दिनांक ०४ फेब्रुवारी २००८ अन्वये जिल्हा परिषदांना दिले आहेत व त्यापुढील वाढीव खर्चाचे अंदाजपत्रक शासनास सादर करावयाचे आहेत. शासनाच्या प्रचलित आदेशानुसार १५ टक्के वरील वाढीव खर्चाच्या अंदाजपत्रकास नियोजन व वित्त विभागाची मान्यता घेवून सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत असून, कार्यवाही पूर्ण करण्यास काही कालावधी लागणार आहे. भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत दिलेले उद्दिष्ट विहित मुदतीत पूर्ण करावयाचे असल्याने या संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(अ)  ज्या पाणी पुरवठा योजनेला प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी दिली आहे परंतू निविदेची कार्यवाही पूर्ण झाली नसून प्रत्यक्षात कामास सुरुवात झाली नाही अशा योजनेची अंदाजपत्रकीय किंमत फक्त बांधकाम साहित्याच्या भाववाढीमुळे (योजनेच्या संकल्पनात व व्याप्ती मध्ये बदल/ वाढ नसल्यास) वाढणार असल्यास अशा योजनेचे सुधारीत अंदाजपत्रक नविन दरसूचीनुसार

D:\2008\GR-08~1\CR 32 08 Papuyo Amalbajavani (G.R.).doc

करुन त्यास पुनःश्च प्रशासकीय मंजुरी ग्रामसभेने / जिल्हा परिषदेने द्यावी व त्यास सुधारीत तांत्रिक मान्यता घ्यावी. अशावेळी मूळ प्रशासकीय/ तांत्रिक मंजुरीचे आदेश रद्द करण्यात यावेत.

(ब) ज्या योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत परंतू बांधकाम साहित्याचे दरात भाववाढ झाल्याने मूळ मंजूर किंमतीमध्ये योजनेचे काम पूर्ण करण्यास अडचणी येत आहेत, अशा योजनेमधील जी कामे पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत Departmental पध्दतीने हाती घेण्यात येत असून, अद्याप काम हाती घेतले नसल्यास अशा उपांगांची अंदाजपत्रके नविन दरसूचीनुसार तयार करुन १५ टक्के पर्यंतच्या वाढीव खर्चाच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय ४ फेब्रुवारी २००८ नुसार जिल्हा जल व्यवस्थान व स्वच्छता समितीकडून सुधारीत प्रशासकीय मंजुरी घ्यावी. तत्पूर्वी रितसर सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्यापूर्वी वाढीव खर्चाच्या अंदाजपत्रकाची तपासणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी करुन जिल्हा परिषद अध्यक्षांची परवानगी घेऊन काम हाती घेण्यास परवानगी देण्यात यावी, तद्नंतर कार्योत्तर मान्यता द्यावी.

(क) वरीलप्रमाणे नियोजन करुन योजनेचे काम १५ टक्के वाढीव खर्चाच्या मर्यादेपर्यंत पूर्ण होणार नसल्यास, सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन मंजुरीसाठी शासनास सादर करावे. दरम्यान योजनेतील आवश्यक ती कामे जशी उद्भव विहिर, उर्ध्ववाहिनी व पंपिंग मशिनरी इत्यादीची कामे पूर्ण करुन गावापर्यंत पाणी आणण्याची कार्यवाही पूर्ण करावी.

९) भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत राज्यातील शाळा/ अंगणवाड्यांमधील पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही सप्टेंबर २००८ पर्यंत पूर्णपणे हाताळावयाचा आहे. सदर कामासाठी प्रत्येक शाळा/ अंगणवाडीसाठी रु. ३०,०००/- पर्यंत खर्चाची मर्यादा आहे. परंतू काही विशिष्ठ परिस्थितीत जास्तीत जास्त ६०,०००/- पर्यंत खर्च करण्याची परवानगी देण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी या वाढीव खर्चाला कार्यकारी अभियंता, यांच्या शिफारशीच्या आधारे मान्यता द्यावी.

१०) वरील मार्गदर्शक सुचना भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेल्या व हाती घ्यावयाच्या योजनांसाठी लागू राहणार असून, त्यातील तरतूदी मार्च २००९ पर्यंत अंमलात राहतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००८०५२२१७४३५७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचा आदेशानुसार व नावाने

**(श्री. श्री. घोलप )**
**कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन**

प्रत :

मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव

मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव

D:\2008\GR-08~1\CR 32 08 Papuyo Amalbajavani (G.R.).doc

विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधीक्षक अभियंता तथा कार्यक्रम समन्वय अधिकारी, भारत निर्माण कक्ष (सर्व विभाग)
सर्व अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद/ अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उप-संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवड नस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

**जिल्हा पाणी पुरवठा योजना आढावा समिती गठीत करण्याबाबत**

---

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
## शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-११०८/प्र.क्र.६३/पापु-०७
## मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक २८ मे, २००८

**प्रस्तावनाः**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मध्ये सुधारणा करुन (सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३) कलम ७९(क ) नुसार जिल्हा परिषदे अंतर्गत **जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती** गठीत करण्याची सुधारीत तरतूद अंतर्भूत करण्यात आली आहे. जिल्हा परिषद स्तरावरील पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक योजनांच्या धोरणात्मक बाबी ही समिती हाताळत आहे.

भारत निर्माण कार्यक्रमाचे हे शेवटचे वर्ष असून कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेले उद्दिष्ट यावर्षी पूर्ण करावयाचे आहे. त्यानुसार सर्व जिल्हयांमधील न हाताळलेली तसेच अंशतः हाताळलेली गावे पूर्ण करण्यात येणार आहेत. भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाणी पुरवठयाचे उद्दिष्ट गुणवत्ता पूर्वक पूर्ण करण्यासाठी आणि या अभियानाला गती देण्यासाठी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत **जिल्हा पाणी पुरवठा योजना आढावा समिती गठीत** करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाणी पुरवठयाचे उद्दिष्ट गुणवत्ता पूर्वक पूर्ण करण्यासाठी आणि या अभियानाला गती देण्यासाठी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत **जिल्हा पाणी पुरवठा योजना आढावा समिती गठीत** करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या समितीची संरचना खालील प्रमाणे असेल :

| | | |
|---|---|---|
| १) | मा.पालक मंत्री | अध्यक्ष |
| २) | मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद | उपाध्यक्ष |
| ३) | मा. पालक मंत्र्यांनी नामनिर्देशित केलेले<br>२ विधानसभा सदस्य व १ विधान परिषद सदस्य | सदस्य |
| ४) | जिल्हाधिकारी | सदस्य |
| ५) | जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक | सदस्य |
| ६) | कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ७) | मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य सचिव |

३. ही समिती जिल्हास्तरावरील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचाआढावा घेईल आणि जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत असलेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीस मार्गदर्शन करेल. तसेच आवश्यक तेथे जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीस सल्ला देईल.

४. जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने घेतलेल्या निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार जिल्हा पाणी पुरवठा आढावा समितीस असेल. जिल्हा पाणी पुरवठा योजना आढावा समितीने या संदर्भात दिलेला निर्णय जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीवर बंधनकारक असेल. जिल्हा पाणी पुरवठा योजना आढावा समितीने दिलेल्या सल्ल्यामुळे / शिफारशींमुळे शासन धोरणात विसंगती निर्माण होणार असेल तर अशा वेळी अंतिम निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात येईल.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०५२८१८४३५५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(श्री. श्री. घोलप)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा.राज्यपाल, यांचे खाजगी सचिव
मा.मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा.उप मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव
मा.पालक मंत्री (सर्व जिल्हे)
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
प्रकल्प व्यवस्थापक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

**जिल्हा पाणी पुरवठा योजना आढावा समिती गठीत करण्याबाबत**

---

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुध्दिपत्रक क्रमांक ग्रापाधो-११०८/प्र.क्र.६३/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक १८ जून, २००८**

**शुध्दिपत्रक:-**

शासन निर्णय समक्रमांक दिनांक २८ मे, २००८ मधील परिच्छेद १ मध्ये जिल्हा नियोजन समिती अंतर्गत **जिल्हा पाणी पुरवठा योजना आढावा समिती** गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या वाक्याऐवजी पुढील वाक्य वाचण्यात यावे.

" जिल्हा नियोजन समिती अंतर्गत **जिल्हा पाणी पुरवठा व संपूर्ण स्वच्छता योजना आढावा** समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. "

सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०६१८१५५७१८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(श्री. श्री. घोलप)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**
मा.राज्यपाल, यांचे खाजगी सचिव
मा.मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा.उप मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव
मा.पालक मंत्री (सर्व जिल्हे)
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
प्रकल्प व्यवस्थापक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, पापु-०७

केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटकांकरीता वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## शासन निर्णय क्र.कखयो२००८/प्र.क्र. १००/वैं.शौ./पापु२१

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

दिनांक - १० सप्टेंबर,२००८

वाचावे:- १) शासन निर्णय क्र.नापापु/क.ख.स्व.यो./वैयक्तीक शौ./१०९६/प्र.क्र.६/पा.पु.२१, दि.१०.१०.१९९६

२) शासन परिपत्रक क्र.पापुवस्वधि/कखस्वयो/वैयक्तीक शौ/१०९७/ प्र.क्र.६/पापु- २१/९७,दि. ८ जूलै,१९९७

३)सचिव ,भारत सरकार,आवास व शहरी गरीबी उपशमन मंत्रालय,निर्माण भवन, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.N-१४०११/१/२००८-LCS(P), दि.११/०२/२००८

४) शासन निर्णय क्र.कखयो२००८/प्र.क्र.३१/पापु२१ दिनांक १६/६/२००८

**प्रस्तावना :-**

केंद्र पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत राज्यातील नागरी भागामध्ये वरील संदर्भाधीन अनु क्रमांक १ व २ मधील शासन निर्णयान्वये सन १९९६-९७ पासून वैयक्तिक शौचकूप बांधकाम कार्यक्रम राबविण्यास सुरुवात करण्यात आली. केंद्र शासनाच्या आकृतीबंधानुसार या कार्यक्रमांतर्गत ५ व्यक्तिंसाठी असलेल्या शौचालयाचे मुल्य रु.५,०००/- आणि १० व्यक्तिंसाठी असलेल्या शौचालयाचे मुल्य रु.७,०००/- गृहीत धरून केंद्र शासनाकडून राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटकांकरिता सुमारे ३०% आणि कमी उत्पन्न घटकाकरिता सुमारे १७% इतके वित्तीय सहाय्य करण्यात येत होते.

२. योजनेच्या सुरुवातीस या कार्यक्रमांतर्गत एकूण १६१२३२ वैयक्तिक शौचालये बांधण्याचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले होते. तथापि, आतापर्यंत यापैकी केवळ ३४८६३ वैयक्तिक शौचालये बांधून झाली आहेत. कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत बांधावयाच्या वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रमास लाभार्थ्यांकडून खालील कारणांस्तव पुरेशा प्रमाणात प्रतिसाद मिळालेला नाही :-

(१) शौचालय बांधण्यासाठी येणारा प्रत्यक्ष खर्च व त्या तुलनेत मिळणारे केंद्र व राज्य शासनाचे अनुदान व कर्ज अत्यल्प होते.

(२) या कार्यक्रमांतर्गत केवळ द्विशोष खड्डा पध्दतीचे शौचालये बांधण्याची परवानगी दिली होती. तथापि, अनेक ठिकाणी भौगोलिक कारणामुळे तसेच जागेच्या कमतरतेमुळे या पध्दतीचे शौचालये बांधणे शक्य होत नव्हते.

(३) हुडकोकडून विविध कारणांमुळे नामंजूर करण्यात आलेले अनेक नागरी संस्थांचे प्रस्ताव.

(४) बऱ्याच नागरी संस्थांनी हुडको सोबत करार न केल्यामुळे हुडकोकडून रद्द करण्यात आलेले प्रस्ताव.

(५) या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी नागरीकांकडून व नागरी संस्थांकडून पाठपुरावा करण्याच्या प्रवृत्तीचा आढळून आलेला अभाव.

(६) या कार्यक्रमाच्या प्रचार व प्रसार पुरेसा झाला नाही.

(७) अशासकीय संस्थांचा (NGO) सहभाग नसणे.

३. तथापि, राज्याचा नागरी भाग संपूर्णतः हागणदारी मुक्त होण्याच्या दृष्टीकोनातून घर तेथे शौचालय या तत्वावर कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत वैयक्तिक शौचकूप बांधकाम कार्यक्रम यशस्वी होणे अत्यंत आवश्यक आहे. या योजनेचा जास्तीत जास्त लोकांनी /नागरी संस्थांनी लाभ घेऊन ही योजना यशस्वी व्हावी याकरीता योजनेच्या अस्तित्वातील निकषांमध्ये सुधारणा करणे नितांत आवश्यक होते. त्यानुसार केन्द्र शासनाच्या गृहनिर्माण व नागरी गरीबी निर्मुलन मंत्रालयाने त्यांच्या उपरोक्त पत्रान्वये कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत वैयक्तिक शौचकूप बांधकामाकरिता विहीत निकषांमध्ये सुधारणा केली आहे. कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत अस्तित्वातील निकष व केन्द्र शासनाने त्यात प्रस्तावित केलेले बदल विचारात घेता, सुधारीत योजना अमलात आणल्यास या योजनेस जनतेकडून निश्चितपणे मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळेल. केंद्र शासनाच्या सुधारित योजनेनुसार वैयक्तिक शौचकूप बांधकामाचे मुल्य रु.१००००/- (रुपये दहा हजार फक्त प्रति शौचकूप) गृहीत धरून केन्द्र शासनाचे ७५% व राज्य शासनाचे १५% अनुदान, लाभार्थी हिस्सा केवळ १०%, आर्थिक सहाय्यातून बाद केलेला कर्ज घटक, भौगोलीक परिस्थिती अनुरुप कोणत्याही पद्धतीचे शौचालय बांधण्याची मुभा, अशासकीय संस्थांचा सहभाग यासारख्या प्रस्तावित बदलांमुळे ही योजना लोकाभिमुख होऊन लाभार्थी मोठ्या प्रमाणात या योजनेचा लाभ घेण्यास पुढे येतील. त्यामुळे कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक तत्वांनुसार राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटकांकरिता वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रमाची राज्यात तात्काळ अंमलबजावणी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय :-

राज्याच्या नागरी भागातील (महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्र) आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांकरिता वैयक्तीक शौचालय नसलेल्या प्रत्येक घरांमध्ये वैयक्तिक शौचालयांची उपलब्धता व्हावी यासाठी केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत सुधारित मार्गदर्शक तत्वांनुसार वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम राज्यातील सर्व शहरांमध्ये राबविण्यात यावा. हा कार्यक्रम राज्यातील सर्व नागरी संस्थांनी नागरी स्वच्छतेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अशासकीय संस्थांच्या सहकार्याने राबवावा.

२. या कार्यक्रमांतर्गत राज्याच्या नागरी भागामध्ये स्वतःच्या मालकीचे घर असूनही शौचालयाची व्यवस्था नसलेल्या आर्थिक दुर्बल घटकांमधील नागरिकांना, (एका कुटुंबांमध्ये कमाल ५ व्यक्ती गृहीत धरून प्रति कुटुंब शौचालय याप्रमाणे) या योजनेचा लाभ मिळणार आहे. केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाकडून सन २००१ च्या भारतीय जनगणनेनुसार राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी विविध योजनांतर्गत लाभ देताना उत्पन्नाची मर्यादा ही प्रतिकुटुंब प्रतिमाह रु.३,३००/- इतकी विहीत करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी वैयक्तिक शौचालये बांधण्याकरिता प्रति कुटुंब उत्पन्नाची मर्यादा रु.३,३००/- प्रतिमहा इतकी विहीत करण्यात येत आहे.

F:\NEWLCS~1\Rev. G.R. - १.९.२००८.doc

1 - 1958 - 1a.

३. या कार्यक्रमांतर्गत दोन खड्ड्यांची (TWO PIT POUR FLUSH) अथवा स्थानिक परिस्थितीस अनुरुप अशा पद्धतीची शौचालये बांधण्यात यावी.

४. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार प्रती शौचालय बांधकामाचा खर्च रु. १०,०००/- याप्रमाणे प्रती कुटुंब वित्तीय सहाय्याचा आकृतीबंध खालील प्रमाणे आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| केंद्र शासनाचे अनुदान | ७५ % | - | रु.७,५००/- |
| राज्य शासनाचा हिस्सा | १५% | - | रु.१,५००/- |
| लाभार्थी हिस्सा | १०% | - | रु.१,०००/- |

५. शौचालय बांधकामास स्थानिक परिस्थीतीनुसार रु.१०,०००/- पेक्षा होणारा अधिक अतिरिक्त खर्च संबंधित नागरी संस्थांनी स्व:निधीतून करावा.

६. प्रत्येक शहरातील आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तींचा सर्व्हे करुन लाभार्थ्यांची संख्या निश्चित करणे, लाभार्थ्यांना Biometric पध्दतीची ओळखपत्रे देणे, जनजागृती करण्यासाठी चर्चासत्रे/प्रशिक्षण आयोजीत करणे,लाभार्थ्यांनी करावयाच्या खर्चाची रक्कम गोळा करुन ती नागरी संस्थांकडे जमा करणे याकरीता शासनामार्फत नागरी संस्थांकरीता नागरी स्वच्छतेच्या क्षेत्रात कार्यरत असणा-या अशासकीय संस्थांची (NGO) निवड करण्यात येईल. अशा NGO ना त्यांच्या कामाचा मोबदला एकूण प्रकल्प खर्चाच्या व्यतिरिक्त १५% मर्यादेपर्यंत उपलब्ध करण्यात येणाऱ्या निधी मधून देण्यात येईल. हा खर्च केंद्र व राज्य शासनामार्फत अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांवर ५:१ या प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात येईल.

७. नागरी संस्थांनी NGO नी केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे केंद्र शासनाने विहीत केलेल्या वित्तिय आकृतीबंधाप्रमाणे सविस्तर प्रस्ताव व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन ते राज्य शासनास सादर करावे. नागरी भागातील घरनिहाय सर्व्हेक्षणाकरिता आवश्यक प्रपत्र सोबत जोडण्यात येत आहे.

८. समन्वय यंत्रणेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांना मंजूरी देण्यासाठी तसेच प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे सनियंत्रण करण्यासाठी संदर्भीय अनु क्रमांक ४ मध्ये नमूद केलेल्या दिनांक १६/६/२००८ च्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली राज्य समन्वय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

९. समन्वय यंत्रणेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यांना राज्य समन्वय समितीची मंजुरी घेऊन ते हूडकोच्या विभागीय कार्यालयास सादर करण्यात येतील.

१०. राज्य शासनाच्या हिश्श्याच्या एकूण अनुदानापैकी १% रक्कम MIS, Monitoring System, Capacity Building [redacted] IEC या घटकांकरीता राखून ठेवण्यात येत आहे. IEC या घटकाकरीता राखून ठेवलेल्या निधीचा वापर प्रकल्प स्थळांना भेटी देणे, नागरी संस्थांशी समन्वय साधणे इ.बाबींकरिता करण्यात यावा.

F:\NEWLCS~1\Rev. G.R. - १.१.२००८.doc

H-1958-2

११. सदरहू योजनेची अंमलबजावणी ही केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व नागरी दारिद्रय निर्मूलन मंत्रालयाकडून करण्यात येईल. प्रकल्प प्रस्तावाच्या मंजूर रक्कमेपैकी केंद्र शासनाच्या अनुदानाची रक्कम नागरी संस्थांना केंद्र शासनाकडून २ टप्प्यांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यापैकी २५% अनुदान संबंधित नागरी संस्थाच्या प्रकल्प प्रस्तावांना केंद्र शासनाकडून मंजुरी देण्यात आल्यानंतर तात्काळ उपलब्ध करून देण्यात येईल. केंद्र शासनाकडून सदरहू पहिला हप्ता मुक्त करण्यात आल्यानंतर संबंधित नागरी संस्थांना राज्य हिश्याचे ५०% अनुदान त्वरित उपलब्ध करून देण्यात येईल.संबंधित नागरी संस्थांची अनुदान उपयोगितेची क्षमता आणि मागणी या बाबी विचारात घेऊन केंद्र शासनाच्या अनुदानाचा उर्वरित हिस्सा थेट मुक्त करण्यात येईल. त्याच धर्तीवर राज्य हिश्याच्या अनुदानाचेही वितरण करण्यात येईल.

१२. शौचालयांचे बांधकाम नागरी संस्थानी स्वत: अथवा त्यांच्या जिल्ह्याकरीता नियुक्त करण्यात आलेल्या अशासकीय संस्थांकडून करुन घ्यावे.

१३. योजनेच्या प्रगतीचा त्रैमासिक अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे नागरी संस्थांनी नियमितपणे समन्वय यंत्रणेमार्फत शासनास सादर करावीत.

१४. राज्याचा नागरी भाग हागणदारी मुक्त होण्याच्या दृष्टीने कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत राबविण्यात येणारा सदर वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम यशस्वी होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सर्व नागरी संस्थांनी या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकडे काटेकोरपणे लक्ष देऊन तो विहीत कालमर्यादेत पूर्ण होईल व अनावश्यक कालापव्यय होऊन प्रकल्प खर्चात वाढ होणार नाही याची यथायोग्य दक्षता घ्यावी.

१५. सदर कार्यक्रमांतर्गत राज्य हिश्श्याचे अनुदान शहरी आर्थिक दुर्बल घटकांचे सर्वेक्षण करुन त्यामधून लाभार्थी निश्चित करणे, वृत्तपत्रातून जाहिरात देवून नागरी स्वच्छतेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अशासकीय संस्थांनी (N.G.O.) निवड करणे, त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला अदा करणे इ. प्राथमिक स्वरुपाच्या कामासाठी मंजूर करण्यात येत असून या कामासाठी होणारा खर्च पावसाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे "मागणी क्र वाय-२, २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता ०२, जलनिस्सारण व स्वच्छता, १०५ स्वच्छता व सेवा - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०१) (०१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला कमी खर्चाच्या स्वच्छता कार्यक्रमासाठी सहायक अनुदान (२२१५ १७२७), ३१, सहायक अनुदान (वेतनेतर) " या अर्थसंकल्पिय लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

१६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०९१२१६५५५७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजितकुमार जैन)
प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. महापौर, महानगरपालिका (सर्व)

२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

G:\Rev. G.R. - १०.९.२००८.doc

३. विभागीय आयुक्त (सर्व)
४. जिल्हाधिकारी (सर्व)
५. महालेखापाल,महाराष्ट्र-१,मुंबई [लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा]
६. महालेखापाल,महाराष्ट्र -२,नागपूर [लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा]
७. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई
९. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
१०. कार्यकारी संचालक, हुडको विभागीय कार्यालय,मुंबई
११. नगराध्यक्ष, नगर परिषदा (सर्व)
१२. मुख्याधिकारी, नगर परिषदा (सर्व)
१३. सर्व वैधानिक विकास मंडळे
१४.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने
१५. सारसंग्रह
१६.निवड नस्ती-पापु-२१

G:\Rev. G.R. - १०.१.२००८.doc

प्रपत्र

FORM NO.

# FORMAT FOR THE PROPOSED
# HOUSEHOLD SURVEY ON LATRINE FACILITIES IN URBAN AREAS

**Location particulars:**

Name of State/Union territory.......................... Code No. | Name of City/Town......................... Code No.

Name of District................ Code No. | Name of Ward/number........................ Code No.

Name of Sub district.............. Code No. | Survey Block No.

**Household particulars:**

| Sl No. | Building No. | Household No. | Name of the head of the household/Respondent | Whether latrine facility available within the house/ premises Yes-1/ No-2 | Give code of the type of latrine facility available as per response in Col 5 |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| Count and give total of each code of Col.(6) | | | Total | 1's | 2's |

| 1's | 2's | 3's | 4's | 5's | 6's | 7's | 8's |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

Type of Latrines

If 'Yes' in Col.(5), give code from the following in Col.(6)

Night soil lifted by Scavengers .......... 1

Night soil serviced by Animals .......... 2

Night soil disposed to open drainage.... 3

Water closet/Flush /Septic latrine........ 4

Pit Latrine.............................................. 5

If 'No' in Col.( 5), then give code in Col.(6) from the following

Public latrine............................................6

Open........................................................7

If none of the category above, give code in Column 6.

Any Other(specify)................................ 8

**CONCEPTS AND DEFINITIONS**

Dry latrine has been put in three categories

(i) Night soil lifted by Scavengers code 1,

(ii) Disposed off by Animals code 2 and

(iii) When night soil is disposed off to a open drainage code 3.

Sum of code 1,2 & 3 will give total number of Dry latrines.

Water closet/flush /septic latrine

If night soil is disposed off by water in under ground sewerage system/ septic tank, code '4' is to be given.

Pit Latrine -code '5' will be given when night soil is disposed off in Pit.

If household is using public latrine or sulabh shochalya made by government or any other agency, code '6' is to be given.

**Open : If an open place is used to disposed off the nigh soil code '7' is to be used.**

**Any other : If none of the above mentioned category is used in "TYPE OF LATRINE", code '8' is to be given and may be specified here** ____________

Name & Signature of Surveyer (with date)..........................................

Signature of supervisor ..........................................

केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटकांकरीता वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम

**महाराष्ट्र शासन**
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
**शासन परिपत्रक क्र.कखयो२००८/प्र.क्र. १३३/वै.शौ./पापु२१**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,**
**दिनांक - २३ ऑक्टोबर,२००८**

वाचावा :- **शासन निर्णय क्र. .कखयो२००८/प्र.क्र. १००/वै.शौ./पापु२१ दि.१०.९.२००८**

राज्याच्या नागरी भागातील (महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्र) आर्थिक दुर्बल घटकातील कुटुंबांकरिता वैयक्तिक शौचालयांची उपलब्धता व्हावी यासाठी राज्यातील सर्व शहरांमध्ये केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत सुधारित मार्गदर्शक तत्वांनुसार वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम राबविण्याचा निर्णय संदर्भीय शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत राज्याच्या नागरी भागातील अर्थिक दुर्बल घटकांसाठी वैयक्तिक शौचालये बांधण्याकरिता प्रति कुटुंब उत्पन्नाची मर्यादा रु.३,३००/- प्रतिमहा इतकी विहीत करण्यात आलेली आहे. सन २०११ पर्यंत राज्य निर्मल घोषित करण्याचा शासनाचा संकल्प असून त्या अनुषंगाने, पुढील ३ वर्षांमध्ये राज्याचा नागरी भाग संपूर्णत: हागणदारी मुक्त होणे आवश्यक आहे. घर तेथे शौचालय या तत्वावर वैयक्तिक शौचकूप बांधकाम कार्यक्रमाची गतीमान यशस्वी अंमलबजावणी होण्याकरिता खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :-

(१) या कार्यक्रमांतर्गत राज्याच्या नागरी भागामध्ये स्वत:च्या मालकीचे घर असूनही शौचालयाची व्यवस्था नसलेल्या आर्थिक दुर्बल घटकांमधील कुटुंबांनाच या योजनेचा लाभ देण्यात यावा.

(२) राज्यातील नागरी संस्थांनी त्यांच्या क्षेत्राकरिता वैयक्तिक शौचालय बांधकामाचा प्रकल्प प्रस्ताव शासनाकडे सादर करताना प्रत्येक नागरी संस्थेने सोबत जोडलेले Bio-Matric Card भरुन देण्याची दक्षता घ्यावी. Bio-Matric Card मधील प्रत्येक रकाना अत्यंत महत्वाचा असून शासनाकडे प्रस्ताव सादर करताना त्यातील एकही रकाना कोरा राहू न देण्याबाबत दक्षता घ्यावी. **Bio-Matric Card चा नमुना यासोबत प्रपत्र-अ (भाग - १ व भाग - २)** वर ठेवलेला आहे.

(३) या कार्यक्रमांतर्गत दोन खड्ड्यांची **(TWO PIT POUR FLUSH)** अथवा स्थानिक भौगोलिक परिस्थितीस अनुरुप अशा पद्धतीची शौचालये बांधावयाची आहेत. प्रत्येक नागरी संस्थेने प्रकल्प प्रस्ताव सादर करताना बांधण्यात येणाऱ्या वैयक्तिक शौचालयाचा प्रकार काळजीपूर्वक नमूद करावा. कोणत्याही प्रकारच्या शौचालयाचे बांधकाम करण्याकरिता स्थानिक परिस्थीतीनुसार आवश्यकतेनुसार रु.१०,०००/- पेक्षा अधिक खर्च झाल्यास तो संबंधित लाभार्थ्यांनी भागविणे आवश्यक राहील.